RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक ११७] मंगळवार, सप्टेंबर २३, २०२५/आश्विन १, शके १९४७ [पृष्ठे १२, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४१८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ सप्टेंबर, २०२५

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक संक्रीआ-१३२४/प्र.क्र.९३/क्रीयुसे-२.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या अधिपत्याखालील क्रीडा व युवक सेवा संचालनालयातील, "सहसंचालक, क्रीडा प्रशिक्षण (गट-अ), उप-संचालक, क्रीडा प्रशिक्षण/विशेष कार्य प्रशिक्षण अधिकारी (गट-अ), मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण), (गट-अ), क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण), (गट-ब राजपत्रित), क्रीडा विकास अधिकारी (प्रशिक्षण), (गट-ब अराजपत्रित), सहायक क्रीडा विकास अधिकारी (प्रशिक्षण), (गट-क)" पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करीत आहेत :-

(१) संक्षिप्त नाव, प्रारंभ :- या नियमांना (गट-अ), (गट-ब) आणि (गट-क) "क्रीडा व युवक सेवा संचालनालयातील सेवाप्रवेश नियम, २०२४" असे संबोधण्यात यावे.

(२) व्याख्या :- सदर नियम दिनांक ०९ जुलै, २०२४ पासून अंमलात येतील.

**२.** या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर.—

(क) "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ,

(*i*) शासकीय सेवेतील सहसंचालक, क्रीडा प्रशिक्षण, गट-अ आणि उपसंचालक, क्रीडा प्रशिक्षण/विशेष कार्य प्रशिक्षण अधिकारी (गट-अ), या पदांवर खेळाडूची नियुक्ती करण्यासाठी सक्षम असणारा मा.मुख्यमंत्री हा प्राधिकारी असा आहे;

(*ii*) शासकीय सेवेतील मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण), (गट- अ) आणि क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण), (गट- ब राजपत्रित) या पदांवर खेळाडूची नियुक्ती करण्यासाठी सक्षम असणारा विभागाचे मंत्री हा प्राधिकारी असा आहे;

(*iii*) शासकीय सेवेतील क्रीडा विकास अधिकारी (प्रशिक्षण), (गट- ब अराजपत्रित) आणि सहायक क्रीडा विकास अधिकारी (प्रशिक्षण), (गट- क) या पदांवर खेळाडूची नियुक्ती करण्यासाठी सक्षम असणारा आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे हा प्राधिकारी असा आहे.

उमेदवाराला संचालनालयात शासकीय सेवेत संबधित पदावर नियुक्त करणारा सक्षम प्राधिकारी.

(ख) "संचालनालय" याचा अर्थ, क्रीडा व युवक सेवा संचालनालय असा आहे;

(ग) "पदोन्नतीसाठीची पात्रता" याचा अर्थ पदोन्नतीसाठीची पात्रतेच्या अटी शर्ती सामान्य प्रशासन विभागाने वेळोवळी विहित केलेले नियम, शासन निर्णय, आदेश यातील तरतुदीनुसार असा आहे;

(घ) "शासन" याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे;

(ड) "उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा" याचा अर्थ महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४१) अन्वये गठीत केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा असा आहे आणि यामध्ये शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो;

(च) "मान्यताप्राप्त संस्था" याचा अर्थ, शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या यादीतील सदर प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त असलेल्या संस्था असा आहे;

(छ) "शालेय शिक्षण व क्रीडा विभाग" याचा अर्थ, शालेय शिक्षण व क्रीडा, महाराष्ट्र शासन असा आहे;

(ज) "छाननी समिती" याचा अर्थ या नियमांमध्ये नमूद केलेल्या पदांवर थेट नियुक्तीसाठी खेळाडूंची शिफारस करण्याच्या प्रयोजनार्थ शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने वेळोवेळी स्थापन केलेली निवड समिती असा आहे;

(झ) "क्रीडा अर्हता" याचा अर्थ शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने खेळाडूंच्या थेट नियुक्ती संदर्भातील संबंधित पदासाठी विहित केलेली आणि तद्नंतर वेळोवेळी विहित करण्यात येणारी क्रीडा अर्हता असा आहे.

**३.** सहसंचालक, क्रीडा प्रशिक्षण (गट-अ) पदावरील नियुक्ती, उपसंचालक, क्रीडा प्रशिक्षण/विशेष कार्य प्रशिक्षण अधिकारी (गट-अ) हे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून पदोन्नतीसाठीची पात्रता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.

**४.** उप-संचालक, क्रीडा प्रशिक्षण/विशेष कार्य प्रशिक्षण अधिकारी (गट-अ) पदावरील नियुक्ती, मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण), (गट-अ) हे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या आणि नियम १३ येथे नमूद केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून पदोन्नतीसाठीची पात्रता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.

**५.** संचालनालयातील मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण), (गट- अ) पदावरील नियुक्ती, पुढील मार्गाने करण्यात येईल.—

**(क) पदोन्नतीने नियुक्ती -**

क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण), (गट-ब राजपत्रित) हे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर पाच वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या आणि नियम १३ येथे नमूद केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून पदोन्नतीसाठीची पात्रता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने,

किंवा

**(ख) थेट नियुक्ती -**

अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना थेट नियुक्तीने, देण्यासंदर्भातील शासनाच्या धोरणानुसार खालील अटी पूर्ण करणाऱ्या खेळाडूंमधून थेट नियुक्तीने,

(एक) वयोमर्यादा –

अ) किमान वयोमर्यादाः- थेट नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या दिनांकास किमान वय १८ वर्षेपेक्षा कमी नसावे;

आ) कमाल वयोमर्यादाः- थेट नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या दिनांकास कमाल वय ४३ वर्षेपेक्षा जास्त नसावे;

(दोन) शैक्षणिक अर्हता;

थेट नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या दिनांकास उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे किंवा त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण केली आहे;

(तीन) क्रीडा अर्हता -

थेट नियुक्तीसाठी अर्ज सादर करण्याच्या दिनांकास शासनाने वेळोवेळी विहित केलेली क्रीडा अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

**६.** क्रीडा कार्यकारी अधिकारी (प्रशिक्षण), (गट- ब राजपत्रित) पदावरील नियुक्ती, पुढील मार्गाने करण्यात येईल -

**(क) पदोन्नतीने नियुक्ती -**

क्रीडा विकास अधिकारी (प्रशिक्षण), (गट-ब अराजपत्रित) हे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर पाच वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या आणि नियम १३ येथे नमूद केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून पदोन्नतीसाठीची पात्रता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने;

किंवा

**(ख) थेट नियुक्ती -**

खालील अटी निकष पूर्ण करणाऱ्या आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने खेळाडूंच्या थेट नियुक्ती बाबत विहित केलेल्या धोरणानुसार समितीने शिफारस केलेल्या अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडूंच्या थेट नियुक्तीने;

(एक) वयोमर्यादा –

अ) किमान वयोमर्यादाः- थेट नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या दिनांकास किमान वय १८ वर्षेपेक्षा कमी नसावे;

आ) कमाल वयोमर्यादाः- थेट नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या दिनांकास कमाल वय ४३ वर्षेपेक्षा जास्त नसावे;

(दोन) शैक्षणिक अर्हता -

थेट नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या दिनांकास उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे किंवा त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण केली आहे;

(तीन) क्रीडा अर्हता -

थेट नियुक्तीसाठी अर्ज सादर करण्याच्या दिनांकास शासनाने वेळोवेळी विहित केलेली क्रीडा अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

**७.** क्रीडा विकास अधिकारी (प्रशिक्षण), (गट- ब अराजपत्रित) पदावरील नियुक्ती, पुढील मार्गाने करण्यात येईल –

**(क) पदोन्नतीने नियुक्ती -**

सहायक क्रीडा विकास अधिकारी (प्रशिक्षण), (गट-क) हे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर पाच वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या आणि नियम १३ येथे नमूद केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून पदोन्नतीसाठीची पात्रता धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने;

किंवा

**(ख) थेट नियुक्ती -**

शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने थेट नियुक्तीसाठी निश्चित केलेल्या धोरणानुसार निवड समितीने शिफारस केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंची थेट नियुक्तीसाठी खालील निकष पूर्ण करणे आवश्यक आहे –

(एक) वयोमर्यादा -

अ) किमान वयोमर्यादाः- थेट नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या दिनांकास किमान वय १८ वर्षेपेक्षा कमी नसावे;

आ) कमाल वयोमर्यादाः- थेट नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या दिनांकास कमाल वय ४३ वर्षेपेक्षा जास्त नसावे;

(दोन) शैक्षणिक अर्हता -

थेट नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या दिनांकास उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे किंवा त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण केली आहे;

(तीन) क्रीडा अर्हता –

थेट नियुक्तीसाठी अर्ज सादर करण्याच्या दिनांकास शासनाने वेळोवेळी विहित केलेली क्रीडा अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

**८.** सहायक क्रीडा विकास अधिकारी (प्रशिक्षण), (गट- क) पदावर शासनाने यासंदर्भात विहित केलेल्या धोरणानुसार, खालील अटी पूर्ण करणाऱ्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंच्या थेट नियुक्तीने करण्यात येईल,

(एक) वयोमर्यादा -

अ) किमान वयोमर्यादाः- थेट नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या दिनांकास किमान वय १८ वर्षेपेक्षा कमी नसावे;

आ) कमाल वयोमर्यादाः- थेट नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या दिनांकास कमाल वय ४३ वर्षेपेक्षा जास्त नसावे;

(दोन) शैक्षणिक अर्हता -

थेट नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या दिनांकास उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे किंवा त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण केली आहे;

(तीन) क्रीडा अर्हता -

थेट नियुक्तीसाठी अर्ज सादर करण्याच्या दिनांकास शासनाने वेळोवेळी विहित केलेली क्रीडा अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

**९.** नियुक्तीचे प्रमाण -

नियम ५, ६ व ७ येथे नमूद केलेल्या पदांवर नियुक्त्या पदोन्नतीने आणि खेळाडूंच्या थेट नियुक्ती मंजूर पदसंख्येच्या ५०:५० या प्रमाणात करण्यात येतील.

**१०.** नियम ५ व ६ मध्ये नमूद केलेल्या पदांवर थेट नियुक्ती दिलेले खेळाडू दोन वर्षासाठी परिविक्षाधीन राहतील. खेळाचा सराव/प्रशिक्षण यासाठीची सवलत घेण्याचा विकल्प दिलेल्या खेळाडूंबाबत, सवलतीचा कालावधी संपल्यानंतर परिविक्षा कालावधी सुरू होईल;

परिवीक्षा कालावधी हा नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या अधिकाराने कमाल एक वर्षापर्यंत वाढविता येईल. सदर परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. तथापि, परिवीक्षा कालावधी अथवा वाढीव परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**११.** नियम ३, ४, ५, ६, ७ व ८ मध्ये नमूद पदांवर कोणत्याही मार्गाने नियुक्त केलेल्या खेळाडूंना, व्यावसायिक स्वरुपाच्या/व्यावसायिक स्तरावर आयोजित होणाऱ्या स्पर्धांमध्ये कोणत्याही स्वरुपाचा सहभाग घेता येणार नाही. खेळाडूने अशा स्पर्धांमध्ये कोणत्याही स्वरुपाचा सहभाग घेतल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

**१२.** नियम ३, ४, ५, ६, ७ व ८ मध्ये नमूद पदांवर कोणत्याही मार्गाने नियुक्त खेळाडू, कोणत्याही क्रीडा स्पर्धेत, उत्तेजक द्रव्य चाचणी (Doping) मध्ये दोषी ठरल्यास आणि सदर उत्तेजक चाचणीबाबत अंतिम आदेश देणाऱ्या संस्थेने सदर आदेश कायम केल्यास, सदर खेळाडूस दिलेली थेट नियुक्ती तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

परंतु असे की सदर खेळाडूने समुचित प्राधिकरणाकडे अपिल दाखल केले असल्यास त्याच्या/तिच्याविरुध्द उत्तेजक द्रव्य चाचणी (Doping) प्रकरणाबाबत चौकशी चालू असेल तोपर्यंत त्याला/तिला, खेळाचा सराव/प्रशिक्षणाकरिता खेळाडू म्हणून देण्यात येणारी सवलत अनुज्ञेय राहणार नाही.

**स्पष्टीकरण –** या नियमाच्या प्रयोजनार्थ "यंत्रणा" ही संज्ञा म्हणजे उत्तेजक चाचणीबाबत अंतिम आदेश देणारी संस्था, जसे की, जागतिक डोपिंग रोधी यंत्रणा (WADA), राष्ट्रीय डोपिंग रोधी यंत्रणा (NADA) व तत्सम यंत्रणा.

**१३.** (क) नियम ५, ६, ७ व ८ मधील पदांवर थेट नियुक्ती दिलेल्या तसेच कायमस्वरुपी समायोजनाने नियुक्ती दिलेल्या खेळाडूंना, नियुक्तीनंतर खालीलपैकी कोणतीही एक अर्हता यापुर्वीच धारण केली नसल्यास, सदर अर्हता ५ वर्षात धारण करणे आवश्यक राहील-

(एक) नेताजी सुभाषचंद्र राष्ट्रीय क्रीडा संस्था, पतियाळा संस्थेचा किंवा सदर संस्थेच्या कोलकाता, बंगळूरू किंवा गांधीनगर येथील विभागीय केंद्राचा किंवा यासंदर्भातील मान्यताप्राप्त संस्थेचा क्रीडा प्रशिक्षण पदविका अभ्यासक्रम पूर्ण करणे;

किंवा

(दोन) आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या किंवा आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने मान्यता दिलेल्या, संबंधित खेळाच्या आंतरराष्ट्रीय महासंघाद्वारे आयोजित केले जाणारे आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा प्रशिक्षण कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारण करणे;

**टीप–** खेळाडू ज्या खेळाशी संबंधित आहे, त्या खेळाच्या आंतरराष्ट्रीय महासंघाद्वारे आयोजित केले जाणारे यथास्थिती "लेव्हल १", "लेव्हल २", "लेव्हल ३" किंवा "लेव्हल ४" कोर्स अथवा "अ", "ब", "क" किंवा "ड" कोर्स यांपैकी कोणताही एक कोर्स यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक आहे.

(ख) वर नमूद केलेली अर्हता धारण करण्यासाठी खेळाडूस, संबंधित कोर्स कालावधी इतकी विशेष रजा मंजूर करण्यात येईल. ही विशेष रजा संपूर्ण सेवा कालावधीत केवळ एकदाच अनुज्ञेय राहील. खेळाडूने सदर अर्हता धारण करेपर्यंत पुढील पदोन्नतीकरीता पात्र ठरणार नाही.

**१४. मराठी व हिंदी भाषा परीक्षेबाबतची तरतूद –**

(क) नियम ३, ४, ५, ६ व ७ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या खेळाडूने, पदोन्नतीपूर्वी हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात मराठी भाषा विभागाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेली असणे अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील. अन्यथा वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय होणार नाही;

(ख) नियम ५, ६, ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदावर थेट नियुक्ती देण्यात येणाऱ्या खेळाडूने, हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात मराठी भाषा विभागाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसेल अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली नसेल तर, नियुक्तीनंतर, विहित मुदतीत हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच विहित मुदतीत हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट मिळेपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

**१५. संगणक अर्हता प्रमाणपत्राबाबतची तरतूद –**

(क) नियम ३, ४, ५, ६ व ७ मध्ये नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या खेळाडूने, पदोन्नतीपूर्वी, संगणक अर्हता प्रमाणपत्रासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण करणे अथवा सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान) यांनी वेळोवेळी शासन आदेशाद्वारे नमूद केलेल्या संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी शासन आदेशानुसार निश्चित केलेल्या वयोमर्यादेनुसार संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील. अन्यथा वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय होणार नाही;

(ख) नियम ५, ६, ७ व ८ मध्ये पदावर थेट नियुक्ती देण्यात येणाऱ्या खेळाडूने, संगणक अर्हता प्रमाणपत्रासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीपूर्वी संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण केलेले नसल्यास, यासंबंधीच्या नियमात विहीत केलेल्या मुदतीत सदर प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत प्रमाणपत्र धारण न केल्यास, सदर संगणक प्रमाणपत्र धारण करेपर्यंत अथवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट मिळेपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

**१६ . लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाची तरतूद —**

१ ) नियम ५, ६, ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदांवर थेट नियुक्ती देण्यात येणाऱ्या खेळाडूने, महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील तरतुदीनुसार व त्याबाबत वेळोवेळी करण्यात येणाऱ्या नियमांनुसार, थेट नियुक्तीच्या वेळी, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहील;

२ ) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करण्याच्या दिनांकास दोनपेक्षा अधिक अपत्य असलेला खेळाडू शासन सेवेत थेट नियुक्तीसाठी अपात्र राहील;

३ ) शासन सेवेत थेट नियुक्तीनंतर खेळाडूस, नियुक्तीच्या वेळेस अथवा त्यानंतर सदर नियमातील तरतुदीनुसार दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिध्द झाल्यास शासन सेवेत.

**१७. बदलीबाबतची तरतूद —**

नियम ३, ४, ५, ६, ७ व ८ मधील पदांवर नियुक्त खेळाडू राज्यात कोठेही बदलीसपात्र राहील. या पदांवर नियुक्त राज्यस्तरीय राहतील. तसेच या पदांवर नियुक्त खेळाडूंच्या पदस्थापना, बदल्यांबाबत, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणाऱ्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१८. शासकीय सेवेत प्रवेश केल्यानंतर सेवाविषयक व अन्य आदेश/नियम लागू होणे.—**

क) शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या कोणत्याही नियम, आदेश किंवा निर्णयान्वये शासकीय कर्मचाऱ्यास नियुक्तीनंतर विनिर्दीष्ट केलेल्या अटी व शर्ती या नियमानुसार नियुक्त केलेल्या खेळाडूंना देखील लागू राहतील;

ख) नियम ३, ४, ५, ६, ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त खेळाडूंच्या सेवाज्येष्ठतेबाबत व ज्येष्ठतायादीबाबत, शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणाऱ्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुनिल पांढरे,**
शासनाचे उप सचिव.

## SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated 22nd September, 2025.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. Sakria-1324/C.R.93/Sport-2.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Joint Director, Sports Coaching, (Group A), Deputy Director, Sports Coaching/Special Duty Executive Officer, Coaching, (Group A), Chief Sports Executive Officer (Coaching), (Group A), Sports Executive Officer (Coaching), (Group B Gazetted), Sports Development Officer, (Group B Non-Gazetted), and Assistant Sports Development Officer (Coaching), (Group C) in the office of the Directorate Sports and Youth Services under administrative control of the School Education and Sports Department of Government of Maharashtra, namely :—

1. *(1) Short title, commencement and application.*— These rules may be called the Officers Group A, Group B, and Group C in the office of the Directororate Sports and Youth Services, Recruitment Rules, 2024".

*(2) Definition.*— These rules shall come into force with effect from 09th July, 2024.

In these rules unless the context requires otherwise,—

(*a*) "Appointing Authority" means,—

(*i*) The Chief minister in respect of Joint Director, Sports Coaching, (Group A) and Deputy Director, Sports Coaching/Special Duty Executive Officer, Coaching, (Group A) posts;

(*ii*) The Minister in charge of the Sports Department, in respect of Chief Sports Executive Officer (Coaching), (Group A) and Sports Executive Officer (Coaching), (Group B Gazetted); and

(*iii*) The Commissioner, Sports and Youth Services, Maharashtra State, Pune in respect of Sports Development Officer (Coaching), Group B Non-Gazetted) and Assistant Sports Development Officer (Coaching), (Group C) posts;

in the Directorate, who shall be competment to appoint the candidate to the concern post in the Government Service;

(*b*) "Directorate" means the Directorate of Sports and Youth Services under the administrative control of School Education and Sport Department;

(*c* ) " Eligibility for promotion" means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion in rules, resolutions or orders issued by General Administrative Department of the Government from time to time;

(*d*) "Government" means the Government of Maharashtra;

(*e*) "Higher Secondary School Certificate Examination" means the Higher Secondary School Certificate Examination conducted by Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education, constituted under the Maharastra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 ( Mah. XLI of 1965) and it includes any other equivalent examination declared by the Government to be equivalent thereto;

(*f*) "Recognised Institute" means the institute included in the list published by the School Education and Sports Department from time to time for the purpose of these rules;

(*g*) "School Education and Sports Department" means the School Education and Sports Department, of the Maharashtra Government;

(*h*) "Scrutiny Committee" means a Scrutiny Committee constituted from time to time, by the School Education and Sports Department for the purpose of selection of candidates by direct recruitment to the posts mentioned in these rules ;

(*i*) "Sports Qualification" means the sports qualification specified from time to time by School Education and Sports Department, in accordance with the policy laid down regarding direct appointment of sports persons on the post mentioned in these rules;

**3.** Appointment to the post of the Joint Director, Sports Coaching, (Group A) in the office of directorate shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Deputy Director, Sports Coaching/ Special Duty Executive Officer, Coaching, (Group A) and having not less than 3 years regular and continuous service on the said post.

**4.** Appointment to the post of the Deputy Director, Sports Coaching/Special Duty Executive Officer, Coaching, (Group A) in the directorate shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Chief Sports Executive Officer (Coaching), (Group A) having not less than 3 years regular and continuous service on the said post and possess the qualification prescribed in Rule 13.

**5.** Appointment to the post of the Chief Sports Executive Officer (Coaching), (Group A) in the directorate shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Sports Executive Officer (Coaching), (Group B Gazetted) and having not less than 5 years regular and continuous service on the said post and possess the qualification prescribed in Rule 13; or

(*b*) by direct appointment of meritorious sports persons recommended by the Scrutiny Committee in accordance with the policy laid down for the direct appointment of sports person by the School Education and Sports Department, who fulfills following criteria, namely :—

(*i*) *Age Limit :—*

(*a*) Lower age limit :— Not less than **eighteen** years of age completed as on the date of submission of an application for direct appointment.

(*b*) Uper age limit :— Not more than **forty- three** years of age as on the date of submission of an application for direct appointment.

*(ii) Educational Qualification :—*

Passed the higher secondary certificate examination or has acquired the higher educational qualification on the date of submission of application for direct appointment.

*(iii) Sports Qualification :—*

Possess the sports qualification priscribed by Government from time to time on the date of submission of application for direct appointment.

**6.** Appointment to the post of the Sports Executive Officer (Coaching), (Group B Gazetted) in the directorate shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Sports Development Officer (Coaching), (Group B Non-Gazetted) and having not less than 5 years regular and continuous service on the said post and possess the qualification prescribed in Rule 13; or

(*b*) by direct appointment of meritorious sports persons recommended by the Scrutiny Committee in accordance with the policy laid down for the direct appointment of sports person by the School Education and Sports Department, who fulfills following criteria, namely :—

*(i) Age Limit :—*

*(a) Lower age limit :-* Not less than **eighteen** years of age completed as on the date of submission of an application for direct appointment.

*(b) Uper age limit :-* Not more than **forty- three** years of age as on the date of submission of an application for direct appointment.

*(ii) Educational Qualification :—*

Passed the higher secondary certificate examination or has acquired the higher educational qualification on the date of submission of application for direct appointment.

*(iii) Sports Qualification :-*

Possess the sports qualification priscribed by Government from time to time on the date of submission of application for direct appointment.

**6.** Appointment to the post of the Sports Development Officer (Coaching), (Group B Non-Gazetted) in the directorate shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Assistant Sports Development Officer (Coaching), (Group C) and having not less than 5 years regular and continuous service on the said post and possess the qualification prescribed in Rule 13; or

(*b*) by direct appointment of meritorious sports persons recommended by the Scrutiny Committee in accordance with the policy laid down for the direct appointment of sports person by the School Education and Sports Department, who fulfills following criteria, namely: -

*(i) Age Limit :-*

(*a*) Lower age limit :- Not less than **eighteen** years of age completed as on the date of submission of an application for direct appointment.

(*b*) Uper age limit :- Not more than **forty- three** years of age as on the date of submission of an application for direct appointment.

(*ii*) Educational Qualification :—

Passed the higher secondary certificate examination or has acquired the higher educational qualification on the date of submission of application for direct appointment.

(*iii*) Sports Qualification:-

Possess the sports qualification priscribed by Government from time to time on the date of submission of application for direct appointment.

**7.** Appointment to the post of the Sports Development Officer (Coaching), (Group B Non-Gazetted) in the directorate shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Assistant Sports Development Officer (Coaching), (Group C) and having not less than 5 years regular and continuous service on the said post and possess the qualification prescribed in Rule 13; or

(*b*) by direct appointment of meritorious sports persons recommended by the Scrutiny Committee in accordance with the policy laid down for the direct appointment of sports person by the School Education and Sports Department, who fulfills following criteria, namely :—

*(i) Age Limit :-*

*(a) Lower age limit :-* Not less than **eighteen** years of age completed as on the date of submission of an application for direct appointment.

(*b*) *Upper age limit :-* Not more than **forty- three** years of age as on the date of submission of an application for direct appointment.

(*ii*) *Educational Qualification :—*

Passed the higher secondary certificate examination or has acquired the higher educational qualification on the date of submission of application for direct appointment.

*(iii) Sports Qualification :—*

Possess the sports qualification priscribed by Government from time to time on the date of submission of application for direct appointment.

**8.** Appointment to the post of the Assistant Sports Development Officer (Coaching), (Group C) in the directorate shall be made by direct appointment of meritorious sports persons recommended by the Scrutiny Committee in accordance with the policy laid down for the direct appointment of sports persons School Education and Sports Department, who fulfills following criteria, namely :—

*(i) Age Limit :-*

*(a) Lower age limit :-* Not less than **eighteen** years of age completed as on the date of submission of an application for direct appointment.

*(b) Uper age limit :—* Not more than **forty- three** years of age as on the date of submission of an application for direct appointment.

(*ii*) *Educational Qualification : -*

Passed the higher secondary certificate examination or has acquired the higher educational qualification on the date of submission of application for direct appointment.

*(iii) Sports Qualification :—*

Possess the sports qualification priscribed by Government from time to time on the date of submission of application for direct appointment.

**9.** Appointment to the post mentioned in Rules 5, 6 and 7 shall be made by Promotion and by Direct Appointment of sports persons, in the ratio of 50:50, respectively, for the total no of sanctioned post to be filled under rules 5, 6, and 7.

**10.** Sport persons directly appointed to the posts mentioned in Rules 5 and 6 shall be on probation for a period of two years. Sport persons who have opted for concession regarding practice/tranning for sports, the probation commence after the concession period is over.

Probation period may be extended by a maximum of one year at the discretion of the appointing authority. Completion of probation period (including extended period) as per probation policy of the Government is mandatory. In the event of failing to complete of probation period (including extended period) as per probation policy of the Government his/her services will be liable to immediately terminated.

**11.** Sport persons appointed by promotion or direct appointment to the posts mentioned in rules 3, 4, 5, 6, 7 and 8 shall not be allowed to participate in any form of competitions organized in the professional form/professional level. If it is found that sport person appointed under these rules have/has participated in any form in such competetion shall be liable for immediately terminated.

**12.** Sport person appointed by any mode to the posts mentioned in Rules 3, 4, 5, 6, 7 and 8, are found guilty of doping in any sporting event and if the order is upheld by the body which gives the final order in respect of the said doping test, the appointment of the said sports person will be terminated with immediate effect.

Provided that, if the said sportsperson files an appeal with the appropriate authority, he/she shall not be admissible for concession regarding sports practice/training, pending the investigation of the doping case.

*Explanation* :— For the purpose of this rule the term "Body" means the bodies that make the final ruling on doping test like the World Anti-Doping Agency (WADA), National Anti-Doping Agency (NADA) and similar bodies.

**13.** (*i*) Sport persons appointed to the posts mentioned in Rules 5, 6, 7 and 8 shall be required to possess any one of the following qualifications within 5 years from the date of appointment, if he/she has not already hold.

(*a*) Certificate of Completion of Diploma Course in Sports Training of Netaji Subhash Chandra National Sports Institute, Patiala or Divisional Center of the said Institute at Kolkata, Bengaluru or Gandhinagar or of a recognized institute in this regard, or

(*b*) Possess a certificate of successful completion of an International Level Sports Training Course organized by an International Federation affiliated to the International Olympic Committee or recognized by the International Olympic Committee of the relevant sport;

**Note**— Should successfully complete any one of course, *viz*-"Level 1", "Level 2", "Level 3" or "Level 4" course or "A", "B", "C" or "D" courses as the case may be, conducted by the International Federation of the sport related to the sports person.

(*ii*) Special leave equivalent to the relevant course duration will be sanctioned to the sportsperson to acquire the qualification mentioned above. This special leave will be admissible only once in the entire period of service. He shall not be eligible for further promotion to the next promotional post until he/she posses the said qualification.

Sport persons who have opted for concession regarding practice/trainging for sports, five years period shall commence after the concession period is over.

**14.** (*1*) A Sport person to be appointed to the posts mentioned in rules 3, 4, 5, 6 and 7 by promotion shall pass the and Marathi and Hindi Languages Examinations as per the rules made or orders issued in that behalf by the government, from time to time, unless he/she has already passed or he/ she has been exempted from passing those examinations before getting promoted to the said post.

(*2*) A Sport person appointed to the post mentioned in rules 5, 6, 7 and 8 by direct appointment shall pass the Marathi and Hindi Languages Examinations as per the rules made or orders issued in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he/she has already passed or has been exempted from passing those examinations. He/She shall not be eligible for annual increment and pormotion to the next promotional post until he/she passes these examinations or exempted from passing these examinations.

**15.** (*1*) A sport person to be appointed to the posts mentioned in rules 3, 4, 5, 6 and 7 by promotion shall possess a certificate of computer Operations perscribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has been exempted therefrom before getting promoted to the said post.

(*2*) A sport person to be appointed the post mentioned in rules 5, 6, 7 and 8 by direct appointment shall possess a certificate of computer operations prescribed by the Government, from time to time. within the perscribed by rules or orders issued time limit after appointment, unless he/she has has been exempted from possessing such Certificate of Computer Operations, otherwise he/she shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possess the same.

**16.** (*1*) A person recommended for appointment by directly to the posts mentioned in rules 5, 6, 7 and 8 by direct appointment shall submit a decleration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Small Family Decleration) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, time to time.

(*2*) A person having more than two childern on the date of submission of Decleration o Small Family shall be disqualified for the appointment in the Government Service.

(*3*) After appointment of a personin the Government Service, if it is proved that he/she has more than two childern at the time of appointment or thereafter, then he/she shall be disqualified for continuing on the said post in the Government Service.

**17.** The person appointed on the posts mention in rules 3, 4, 5, 6, 7 and 8 shall be liable for transfer everywhere in the sate of Maharashtra. The posting, transfer of the sport persons appointed to these posts, shall be made in accordance with the policy of specified by the School Education and Sport Department form time to time in this regad.

**18.** (*a*) The term and conditions specified by the Government, subsequent to the apppoint to the any Government Servant in any rules, orders or resolutions issued by the Government from time to time, shal also be applicable to the sport persons appointed under these rules.

(*b*) The seniority and seniority list of the sport persons appointed under these rules to the post mentioned in rules 3, 4, 5, 6, 7 and 8 shall be governed in accordance with the policy framed by the Government in School Education and Sports Department from time to time.

By order and in the name of Governor of Maharashtra.

SUNIL PANDHARE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.